MHAU080005152026

## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५८/२०२६ मध्ये निशाणी क्र.१ खालील आदेश

*(कमलाकर आन्ना सपकाळ वि. महाराष्ट्र शासन)*

१. अर्जदार कमलाकर आन्ना सपकाळ, रा. शिवना, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी प्रस्तुत अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३, कलम ५०३ प्रमाणे राज्य उत्पादन शुल्क ई-३, विभाग सिल्लोड, यांनी गुन्हा क्र.३२९/२०२५, महाराष्ट्र मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम ६५-अ, ई अन्वये दाखल असलेल्या गुन्हयामध्ये जप्त केलेली अर्जदार यांचे मालकीची मोटरसायकल सुपूर्तनाम्यावर परत मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने संबंधित राज्य उत्पादन शुल्क ई-३, विभाग सिल्लोड, यांचे म्हणणे मागविण्यात आले आहे. त्याप्रमाणे तपासी अधिकारी यांनी लेखी म्हणणे दाखल केले आहे. सरकारी वकील यांनी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, सदरचे वाहनावर पुन्हा दारु वाहतूक करण्याची शक्यता नाकारता येत नाही असे म्हणून त्यांनी वाहनाचा ताबा अर्जदाराकडे देऊ नये अशी विनंती केली आहे.

३. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठ्यर्थ जप्त मोटरसायकल बाबत नोंदणी प्रमाणपत्र, इंश्युरन्स प्रमाणपत्र, अर्जदार यांचे ओळखपत्र इत्यादींच्या छायांकित प्रती ऑनलाईन अभिलेखावर दाखल केलेल्या आहेत. तपासी अधिकारी यांनी दाखल केलेल्या लेखी म्हणण्यानुसार सदर मोटरसायकल ही नमूद गुन्हयामध्ये जप्त करण्यात आली आहे.

४. मा. सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई अंबालाल देसाई – वि- स्टेट ऑफ गुजराथ, (Special Leave Petition (Cri) 2745 of 2002) या न्यायनिवाडयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ प्रमाणे तसेच जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाच्या

अनुषंगाने निर्देश दिलेले आहेत.

५. अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज, तपासी अधिकारी यांचे लेखी म्हणणे व त्या अनुषंगाने दाखल केलेले कागदपत्र तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे वर नमूद न्यायनिवाडयातील निर्देशानुसार, अर्जदार यांचा अर्ज खालील अटी व शर्ती आधारे मंजूर करण्यात येतो. करिता खालीलप्रमाणे आदेश–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. राज्य उत्पादन शुल्क ई–३, विभाग सिल्लोड यांना निर्देश देण्यात येतो की, अपराध क्र.३२९/२०२५ मधील अर्जदार याच्या मालकीची गुन्हयात जप्त केलेली बजाज कंपनीची प्लॅटीना मोटरसायकल क्र.एम.एच–२०–ई.पी–४७१४ अर्जदार यांना रक्कम रुपये ३०,०००/– इतक्या स्वरुपाच्या सुपूर्तनामा मुद्रांका आधारे देण्यात यावे.

३. अर्जदार यांनी सदर मोटरसायकलमध्ये कोणत्याही प्रकारचे फरबदल, हस्तांतर अथवा त्याच्या मूळ स्वरुपात प्रकरणाचा निकाल लागेपावेतो बदल करुन नये किंवा कोणत्याही अन्य मार्गाने विल्हेवाट लावू नये.

४. संबंधित राज्य उत्पादन शुल्क ई–३, विभाग सिल्लोड यांनी जप्त मोटरसायकल याच्या वर्णनाचा तपशिलवार पंचनामा करुन जप्त मोटरसायकलचे छायाचित्र जतन करावे व त्याचा खर्च अर्जदार यांनी दयावा.

५. अर्जदार यांनी सदर जप्त मोटरसायकल तपासी अधिकारी यांना तपासादरम्यान आवश्यकता भासल्यास संबंधित राज्य उत्पादन शुल्क ई–३, विभाग सिल्लोड येथे हजर करावी. तसेच जप्त मोटरसायकलचे कागदपत्र संबंधित राज्य उत्पादन शुल्क ई–३, विभाग सिल्लोड यांना हजर करावे.

13/03/26

**(ए.एच.तट्टु)**

दिनांक. १३.०३.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.०३, सिल्लोड.